महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,

**छत्रपती संभाजी नगर-४३१ ००१.**

# महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना

जा क्र शावैमवरुछसंन/मज्योफुजआयो/ ४०८७/२०२४ दिनांक-२४/०८/२०२४

## "जाहिरात"

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजी नगर येथे वैद्यकीय समन्वयक, वैद्यकीय शिबीर समन्वयक, बिलिंग क्लर्क व डेटा एंट्री ऑपरेटर ही पदे कंत्राटी तत्वावर भरावयाची आहेत. सदरील पदांसाठी उमेदवारांनी दिनांक २४/०८/२०२४ ते २७/०८/२०२४ सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत दिलेल्या लिंकवर जाऊन विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज भरावा. दिनांक २७/०८/२०२४ सायंकाळी ५:०० नंतर सदरील लिंक आपोआप बंद होईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

| अ.क्र. | पदाचे नाव | एकूण पदे | शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन प्रतिमाह |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय समन्वयक (MCO) | १ | एम.बी.बी.एस / बी.ए.एम.एस | एम.बी.बी.एस. ४०,०००/-रुपये<br>बी.ए.एम.एस. ३५,०००/-रुपये |
| २ | वैद्यकीय शिबीर समन्वयक (MCCO) | १ | मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी उत्तीर्ण/ एम. एस. डब्लू. | २५,०००/- रुपये |
| ३ | बिलिंग क्लार्क (Billing Clerk) | १ | मान्यता प्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेतील पदवी उत्तीर्ण | १०,०००/- रुपये |
| ४ | डेटा एंट्री ऑपरेटर (DEO) | ५ | मान्यता प्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेतील पदवी उत्तीर्ण<br>एम.एस.सी.आय.टी व मराठी ३० व इंग्रजी ४० टायपिंग | १०,०००/- रुपये |

- वरील सर्व पदांसाठी MSCIT उत्तीर्ण असणे बंधनकारक आहे.
- वरील सर्व पदांसाठी महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेचा अनुभव तसेच विशेष प्राविण्य असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल.
- बिलिंग क्लार्क या पदासाठी MS-CIT व Account चा अनुभव असल्यास प्राधान्य.
- डेटा एंट्री ऑपरेटर या पदासाठी इंग्रजी ४० व मराठी ३० श.प्र.मी टायपिंग असणे बंधनकारक आहे.

# <u>अटी व शर्ती</u>

**सर्व पदांची नेमणूक ही महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत कंत्राटी व अत्यंत तात्पुरत्या स्वरूपात ११ महिन्यांसाठी असेल. नियुक्ती मिळाल्यानंतर प्रथम एक महिण्याचा कामकाजाचा आढावा घेतल्यानंतर नियुक्ती पुढे चालू ठेवण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.**

१) नियुक्ती दिल्यानंतर उमेदवारांचे काम असमाधानकारक असल्यास, तसेच कामात हलगर्जीपणा केल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची सेवा समाप्त करण्याचा अधिकार संस्थेचे प्रमुख मा.अधिष्ठाता यांनी राखून ठेवले आहे व सेवा समाप्त झाल्यास उमेदवारास कोणत्याही न्यायालयात नेमणुकी संबंधी दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

२) नियुक्त कर्मचाऱ्यांना वेतनाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना सोसायटी यांच्याकडून मानधनाबाबत वेळोवेळी निश्चित व सुधारित मानधन प्राप्त झाल्यास त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

३) महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत प्री-ऑथरायजेशन ते क्लेम पेड पर्यंतची कामे तसेच वेळोवेळी मा.अधिष्ठाता/प्रशासकीय अधिकारी व योजनेतील अधिकारी यांनी कामासंबंधीचे जे आदेश मिळतील ती कामे करणे बंधनकारक असेल, तसे न केल्यास आपली सेवा कुठलीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यात येईल.

४) निवड झालेल्या उमेदवारांना नियमित शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ लागू राहणार नाही व सदर पदावर कायमचा हक्क /दावा करता येणार नाही.

५) सदरील पदांवर ११ महिन्याच्या कालावधीत सेवामुक्त व्हायचे असल्यास १ महिन्याची आगाऊ नोटीस देणे बंधनकारक असेल तसे न केल्यास १ महिन्याचे वेतन शासकीय तिजोरीत जमा केल्यानंतरच कार्यमुक्त करण्यात येईल.

६) दिलेली नेमणूक हि कंत्राटी स्वरूपात ११ महिन्यांची असेल, परंतु महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या अंमलबजावणीसाठी, वरिष्ठ कार्यालयाकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या मार्गदर्शक सूचनांनुसार अथवा बदलानुसार पुढील नियुक्तीची कार्यवाही करण्यात येईल.

७) वैद्यकीय समन्वयक पदासाठी MBBS उत्तीर्ण उमेदवारास प्राधान्य राहील.

८) वैद्यकीय समान्वक पदाची गुणवत्ता यादी तयार करतांना पुढील बाबींचा विचार करण्यात येईल – एम. बी. बी. एस./बी. ए. एम. एस. अंतिम वर्षाचे गुण, शैक्षणिक अर्हता प्राप्त करण्यासाठी केलेले प्रयत्न (Attempt), वय.

९) वैद्यकीय शिबीर समन्वयक, बिलिंग क्लार्क व डेटा एन्ट्री ऑपरेटर या पदासाठी गुणवत्ता यादी तयार करतांना अनुक्रमे पुढील बाबींचा विचार करण्यात येईल - MS-CIT चे गुण, पदवीचे गुण, पदवी परीक्षा प्राप्त करण्यासाठी केलेले प्रयत्न (Attempt), यापूर्वी मज्योफुजआ योजनेत केलेले उल्लेखनीय काम (प्रशस्तीपत्र जोडावे) व वय.

१०) प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार निकष ठरूवून छाननीत पात्र उमेदवारांची गुणानुक्रमे निवड यादी व प्रतीक्षा यादी तयार करण्यात येईल, वरील निकषा नंतर एका पेक्षा अधिक उमेदवारांना समान गुण/प्रतवारी असल्यास प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे निर्णय घेण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता यांनी राखून ठेवले आहेत. याबाबतचा समितीचा निर्णय अंतिम राहील.

११ ) महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात काम केलेल्या उमेदवारास प्रथम प्राधान्य राहील,

तदनंतर सार्वजनिक आरोग्य विभाग व नंतर खाजगी संस्थेचा अनुभव व उल्लेखनीय कामगिरी असलेल्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल. यापूर्वीच्या सेवा कालावधीत उमेदवाराच्या कामकाजाबाबत तक्रार असल्यास त्याचा अर्जामध्ये स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे. सदर तक्रारीत तथ्य आढळल्यास अश्या उमेदवारांच्या अर्जाचा निवड सूचीमध्ये समावेश करण्यात येणार नाही.

१२) वरील पदांच्या उमेदवाराला मराठी भाषा लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.

१३) उमेदवारांनी चुकीची माहिती अथवा कागदपत्रे सादर केल्यास त्यांचे उमेदवारी अर्ज रद्दबादल ठरवण्यात येईल. तसेच अश्या उमेदवारांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

१४) ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याची तारीख दिनांक २४/०८/२०२४ ते २७/०८/२०२४ संध्याकाळी ०५:०० पर्यंत राहील. उमेदवारी अर्ज खालील लिंक वर भरावा. ऑफलाईन अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.
https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSdtfmt5p7iqLkNTnXZPFdTAq2Dpn_fss7UvIjAF8_yrfsNzGw/viewform?usp=sf_link

१५) सदर पदांसाठी प्रतीक्षा यादी व गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल व त्या यादीची वैधता १ वर्ष राहील.

१६) या पूर्वी ज्यांनी अर्ज सदर केले आहेत त्या उमेदवारांनी पुन्हा ऑनलाईन अर्ज भरणे बंधन कारक आहे, तसेच यापूर्वी सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

१७) ऑनलाईन अर्जात नमूद केलेला तपशील अंतिम समजण्यात येईल, नंतर सादर केलेले कोणतेही कागदपत्रे स्वीकारली जाणार नाहीत.

**१८) निवड प्रक्रियेदरम्यान उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास अश्या उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.**

**१९) निवड प्रक्रियेत कसलाही प्रकारचा वाद अथवा संभ्रम निर्माण झाल्यास निवड समिती व मा. अधिष्ठाता यांचा निर्णय अंतिम समजण्यात येईल.**

२०) उमेदवारांची नियुक्ती ही पूर्ण वेळ कामकाजासाठी असेल. तसेच रुग्णसेवेसाठी व संस्थेच्या गरजेनुसार कामकाजाच्या वेळेत बदल करण्यात येईल.

२१ ) वैद्यकीय समन्वयक (MCO), वैद्यकीय शिबीर समन्वयक (MCCO) पदासाठी सुरक्षा ठेव रु.१०,०००/-(अक्षरी रुपये दहा हजार) (REFUNDABLE) एवढी असेल, जी नियुक्तीच्या वेळेस शासकीय तिजोरीत जमा करावी लागेल व इतर पदांसाठी रु.५,००० (अक्षरी रु पाच हजार ) (REFUNDABLE) एवढी असेल, जी नियुक्तीच्या वेळेस शासकीय तिजोरीत जमा करावी लागेल.

२२) सदरील जाहिरात संस्थेच्या संकेत स्थळावर http://www.gmcaurangabad.com प्रसिद्ध करण्यात येईल तसेच रुग्णालयाच्या सूचनाफलकावर लावण्यात येईल.

२३) भरतीसंबंधीचे सर्व अधिकार मा.अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय छत्रपती संभाजी नगर यांनी राखून ठेवले

आहेत (उदा.जाहिरातीच्या मजकुरात बदल करणे, पदाच्या अटी/शर्ती मध्ये बदल करणे, पदांच्या संखेत बदल करणे,जाहिरात रद्द करणे,ई.).

**अर्जासोबत खालील प्रमाणे कागदपत्रे जोडावीत-**

१) आधार कार्ड.
२) रहिवासी प्रमाणपत्र / राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र.
३) दहावी प्रमाणपत्र.
४) बारावी प्रमाणपत्र.
५) पदवी प्रमाणपत्र.
६) MS-CIT प्रमाणपत्र
७) महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेचे अनुभव प्रमाणपत्र.
८) लहान कुटुंब प्रमाणपत्र.
९) यापूर्वी मज्योफुजआ योजनेत केलेले उल्लेखनीय कामाचे प्रमाणपत्र.
१०) टायपिंग प्रमाणपत्र इंग्रजी -४० व मराठी -३०.( डेटा एंट्री ऑपरेटर)
११) MBBS/BAMS पदवी प्रमाणपत्र/ (वैद्यकीय समन्वयक पदाकरिता)
१२) MBBS/BAMS गुणपत्रिका. (वैद्यकीय समन्वयक पदाकरिता)
१३) MBBS/BAMS उत्तीर्ण प्रयत्न प्रमाणपत्र. (वैद्यकीय समन्वयक पदाकरिता)
१४) MBBS/BAMS (आंतरवासिता प्रमाणपत्र- वैद्यकीय समन्वयक पदाकरिता)
१५) MBBS/BAMS MCI/MMC Registration and Renewal Certificate.

**महत्वाच्या तारखा**

| | |
|---|---|
| ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याची तारीख | दिनांक २4/०८/२०२४ ते २७/०८/२०२४ सायंकाळी ०५:०० पर्यंत. |
| अर्जाची छाननी | दिनांक २८/०८/२०२४ ते २९/०८/२०२४ |
| अंतिम निवड यादी व प्रतीक्षा यादी | दिनांक ३०/०८/२०२४ |

**<u>स्वाक्षरीत</u>**
**अधिष्ठाता,**
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,**
**छत्रपती संभाजी नगर.**